जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/ ६०५५ /२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- ०८/०५/२०२४

विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे ज्या लोकसभा मतदार संघात जे मतदार नाहीत त्यांनी त्या मतदार संघात न थांबणेबाबत.

आदेश,

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे पत्र क्र.४३७/६/१/ECI/PN/23/2024 DATE 16.03.2024 अन्वये १८ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला असुन दिनांक १६/०३/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आदर्श आचारसंहीता अस्तित्वात राहील. ३४ पुणे व ३६ शिरुर लोकसभा मतदार संघात मतदान दिनांक १३/०५/२०२४ रोजी होणार आहे.

पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात ३४ पुणे लोकसभा मतदार संघात २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २१२ पर्वती, २१४ पुणे कॅन्टोंमेंन्ट व २१५ कसबा पेठ विधानसभा मतदार संघाचा तसेच ३६ शिरुर लोकसभा मतदार संघात १९८ शिरुर व २१३ हडपसर विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे.

निवडणूक आयोग, भारत सरकार यांचेकडील पत्र क्र.४६४/आय.एन.एस.टी./२००७/पी.एल.एन.-१, दिनांक ०८/०१/२००७ व दिनांक २७/०२/२००७ अन्वये प्रचार संपल्यानंतरच्या वेळेपासून मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत राजकीय व्यक्तींवर जर ते त्या मतदार संघाचे मतदार नसतील तर त्या मतदार संघात थांबणेबाबत प्रतिबंध करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सर्व राजकीय व्यक्तींना किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत असलेल्या कोणत्याही व्यक्तींस ते ज्या लोकसभा मतदार संघाचे मतदार नाहीत, त्या लोकसभा मतदार संघात थांबणेस/वास्तव्य करण्यास प्रतिबंध करणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी प्रविण पवार, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दिनांक ११/०५/२०२४ चे १८.०० वा. पासून ते दिनांक १३/०५/२०२४ चे २४.०० वा. पर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) सर्व राजकीय व्यक्तीं किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत कोणतीही व्यक्ती ते ज्या लोकसभा मतदार संघाचे मतदार नाहीत, त्या मतदार संघात थांबणेस/वास्तव्य करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदर आदेशांचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि. ८ /०५/२०२४ रोजी दिला आहे.

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

८/५/२४

(प्रविण पवार)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- ८ /०५/२०२४

जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/ ६०५३ /२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- ०८ /०५/२०२४

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे** मतदान केंद्राचे १०० मीटर चे परिक्षेत्रातील व्यवसायीक दुकाने व आस्थापना बंद ठेवणे बाबत आदेश.

आदेश,

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे पत्र क्र.४३७/६/१/ECI/PN/23/2024 DATE 16.03.2024 अन्वये १८ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला असुन दिनांक १६/०३/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आदर्श आचारसंहीता अस्तित्वात राहील. **३४ पुणे व ३६ शिरुर लोकसभा मतदार संघात मतदान दिनांक १३/०५/२०२४ रोजी** होणार आहे.

पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात ३४ पुणे लोकसभा मतदार संघात २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २१२ पर्वती, २१४ पुणे कॅन्टोंमेन्ट व २१५ कसबा पेठ विधानसभा मतदार संघाचा तसेच ३६ शिरुर लोकसभा मतदार संघात १९८ शिरुर व २१३ हडपसर विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे.

३४ पुणे लोकसभा मतदार संघात एकुण ४०५ मतदान केंद्रे (इमारत) मधील २०१७ बुथवर तसेच ३६ शिरुर लोकसभा मतदार संघात एकुण १२९ मतदान केंद्रे (इमारत) मधील ७०८ बुथवर मतदान होणार आहे. मतदान सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सदर मतदान केंद्रांच्या परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसराच्या जागेचा प्रचारासाठी व इतर कारणांसाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने सदर मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

**त्याअर्थी, मी प्रविण पवार, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात** ३४ पुणे लोकसभा मतदार संघात एकुण ४०५ मतदान केंद्रे (इमारत) मधील २०१७ बुथवर तसेच ३६ शिरुर लोकसभा मतदार संघात एकुण १२९ मतदान केंद्रे (इमारत) मधील ७०८ बुथवर **१०० मीटर परिसरात दिनांक १३/०५/२०२४ रोजी ००.०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया संपेपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.**

१) ३४ पुणे लोकसभा मतदार संघात एकुण ४०५ मतदान केंद्रे व ३६ शिरुर लोकसभा मतदार संघात एकुण १२९ मतदान केंद्रांचे (इमारतीचे) १०० मीटर परिसराचे आतील सर्व व्यवसायीक दुकाने, रेस्टॉरंन्ट, टपऱ्या (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना बंद ठेवावेत.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि. ८/०५/२०२४ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- ८/०५/२०२४

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

८/५

(प्रविण पवार)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर

जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/ ६०५४ /२०२४

पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे

दिनांक :-०८ / ०५/२०२४

**<u>विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे</u>**
**बेकायदेशीर जमाव न जमवणे आणि सार्वजनिक सभा/बैठका न घेणे बाबत...**

<u>आदेश,</u>

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे पत्र क्र.437/6/1/ECI/PN/23/2024 DATE 16.03.2024 अन्वये १८ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला असुन दिनांक १६/०३/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आदर्श आचारसंहीता अस्तित्वात राहील. **३४ पुणे व ३६ शिरुर** लोकसभा मतदार संघात दिनांक १३/०५/२०२४ रोजी मतदान होणार आहे.

**पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात** ३४ पुणे लोकसभा मतदार संघात २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २१२ पर्वती, २१४ पुणे कॅन्टोंमेंन्ट व २१५ कसबा पेठ विधानसभा मतदार संघाचा तसेच ३६ शिरुर लोकसभा मतदार संघात १९८ शिरुर व २१३ हडपसर विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे.

निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे SOP FOR LAST 72 HOURS यातील मुद्दा क्र. 4.1.1 अन्वये मतदान प्रक्रिया पुर्ण होण्याच्या ४८ तास अगोदर पासुन मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत खालील नमुद कृत्ये न करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी मतदान प्रक्रिया पुर्ण होण्याच्या ४८ तास अगोदर पासुन बेकायदेशीर जमाव जमवणे, सार्वजनिक सभा बैठका घेणे यास प्रतिबंध करणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी प्रविण पवार, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रापैकी ३४ पुणे व ३६ शिरुर लोकसभा मतदार संघ क्षेत्रात दिनांक ११/०५/२०२४ चे १८.०० वा. पासून ते दिनांक १३/०५/२०२४ चे २४.०० वा. पर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) बेकायदेशीर जमाव न जमवीने आणि सार्वजनिक सभा बैठका न घेणे.
२) पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोक एकत्र न येणे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि.८ /०५/२०२४ रोजी दिला आहे.

०८/०५/२४

(प्रविण पवार)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर

पोलीस सह आयुक्त
पुणे शहर

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- ८/०५/२०२४